PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Paach Najuk Bote
Year: 1972

Song: Sutaat Firta Mamaicha Disata
Lyricist: Jagdish Khebudkar

सुटात फिरतं
हे ममईचं दिसतं
अरे सुटात फिरतंस
ममईचं दिसतं
आल्या वाटनं जाशील का
खेडवळ पोरी
अग दिसतीस न्यारी
खेडवळ पोरी
दिसतीस न्यारी
अन् माझ्यासंग ममईला
येशील का
माझ्यासंग मुंबईला येशील का ग
माझ्यासंग बॉम्बेला येशील का
मुमईत काय तूझ गाठोड पुरलयं
कानात माझ्या सांगशील का
मुमईत काय तूझ गाठोड पुरलयं
कानात माझ्या सांगशील का
अरं कानात माझ्या सांगशील का
माझ्या सायबां
मऊ मऊ वाळूत जोडीनं
भेळपुरी खाऊ की गोडीनं
मऊ मऊ वाळूत जोडीनं
भेळपुरी खाऊ की गोडीनं
हातात हात
चांदनी रात
हातात हात
चांदनी रात
सागर शोभा बघशील का
अन् माझ्यासंग ममईला
येशील का
माझ्यासंग मुंबईला येशील का ग
माझ्यासंग बॉम्बेला येशील का
अरं येईन येईन येईन
पर सांगू काय करीन
सांग सांग सांग
जात्यावर ओवी गाईन मी
कांदा भाकरी खाईन मी
जात्यावर ओवी गाईन मी
कांदा नी भाकरी खाईन मी
शाळूचा हुरडा ऊन ऊन
मिरच्याचा खरडा लाल लाल
शाळूचा हुरडा
मिरच्याचा खरडा
खायाला भरपेट देशील का
नाहीतर माघारी जाशील का
अरं नाहीतर माघारी जाशील का
अग माझ्यासंग ममईला
येशील का
ठाव हाय ममई
फुकटचा तोरा
घामाच्या धारा अन् पंख्याचा वारा
ठाव हाय ममई
फुकटचा तोरा
घामाच्या धारा अन् पंख्याचा वारा
घामाच्या धारा अन् पंख्याचा वारा
जा जा जा अरं जा जा जा
माझ्या सायबां
सायबाचा शिनीमा दावीन मी

नाचायला कॅबरे लावीन मी
सायबाचा शिनीमा दावीन मी
नाचायला कॅबरे लावीन मी
इंपाला गाडी
छेडाछेडी
इंपाला गाडी
छेडाछेडी
खांदयावर मान तू टाकशील का
मंग आता
माझ्यासंग ममईला येशील का
माझ्यासंग मुंबईला येशील का ग
माझ्यासंग बॉम्बेला येशील का
पूरे तूझी ममई
खेडयात चल
खेडयात चल
अन् काय कर
जिमीनीचा वाफा फुलवावा
तिथं नांगर फाळा चालवावा
जिमीनीचा वाफा फुलवावा
तिथं नांगर फाळा चालवावा

हिरव्या रानी गारगार
वाजल पाणी झूळझूळ
हिरव्या रानी
वाजल पाणी
मोटची लावनी गाशील का
माझ्या ढवळयाला वढ हा...
माझ्या पवळयाला वढ हा...
हूं त्यो काय येतोय चला ग
चला चला
तुझ्यासाठी मी मंबई सोडली
आता खेडयाशी सोयरीक जोडली
तुझ्यासाठी मी मंबई सोडली
आता खेडयाशी सोयरीक जोडली
सुखाची संगत
अग मायेची रंगत
सुखाची संगत मायेची रंगत
हिरवी दुनिया दावशील का
हिरवी दुनिया दावशील का
राजाची राणी तू होशील का
या राजाची राणी तू होशील का

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*